मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २६ मार्च १९७६
रोजी भरलेल्या पाचव्या बैठकीचे कार्यवृत्त.

(१) उपस्थित सदस्यांची सूची सोबत जोडली आहे. जोडपत्र 'अ'.

(२) बैठकीच्या प्रारंभी अध्यक्षांचे भाषण झाले. भाषणाची प्रत सदस्यांमध्यें प्रसृत करण्यात आली होती. ही प्रत जोडपत्र 'ब' म्हणून जोडली आहे.

(३) बाब क्रमांक (१): २६ मार्च १९७६ रोजी भरलेल्या मागील (पाचव्या) बैठकीच्या कार्यवृत्तांला पुष्टी देणे.

ठराव (६२): १४ फेब्रुवारी १९७६ रोजी भरलेल्या चौथ्या बैठकीच्या कार्य-वृत्तांस पुष्टी देण्यांत आली.

बाब क्रमांक (२): मागील बैठकीच्या कार्यवृत्तांवर केलेली कार्यवाही.

ठराव (६३): केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

बाब क्रमांक (३): भारत सरकारच्या कर्जसहाय्याच्या अटींमध्यें सुधारणा.

ठराव (६४): या बाबीवर विचार करण्यात आला व त्याची नोंद घेण्यांत आली.

बाब क्रमांक (४): मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प.

ठराव (६५): प्राधिकरणाने कार्यसूची क्रमांक ४ च्या मुंबई नागरी वाहतूक प्रकल्पाशी संबंधित असलेल्या बाबीवर चर्चा केली व खालील प्रमाणें ठराव केला :-

(अ) जागतिक बँकेच्या मूल्यन मंडळाने मूल्यन केल्याप्रमाणें व कार्यसूचीस जोडलेल्या टिप्पण्यांमध्यें नमूद केल्याप्रमाणें मुंबई नागरी वाहतूक प्रकल्पासाठी जागतिक बँकेकडून कर्ज मिळवण्याचा प्रयत्न करावा.

(ब) महानगर आयुक्तांनी, मूल्यन टिप्पणीत निर्दिष्ट केलेल्या मुद्यांवर आणि त्या प्रत्येक मुद्याबाबत कार्यसूचीत केलेल्या शिफारशींनुसार कार्यवाही करावी, अशी कार्यवाही करताना जेथे अध्यक्षांचे आदेश आवश्यक असतील तेथे तसे आदेश मिळवावे,

(क) जागतिक बँकेच्या कर्जाच्या अटी व प्रमाण हे, विदेशी चलनाच्या दृष्टीने संपूर्ण देशाचे हित लक्षात घेऊन भारत सरकारने ठरवल्याप्रमाणें असेल. या अटी आणि जागतिक बँकेकडून कर्ज देण्यासंबंधी कोणत्याही अटी घालण्यात आल्यास त्या अटी यांना अधीन राहून, अशा प्रकारे घेतलेल्या कर्जाची रक्कम, मुंबई नागरी वाहतूक प्रकल्पाच्या गरजांनुसार मुंबई महानगरपालिकेला (तिच्या स्वत:च्या तसेच बेस्टच्या वापरासाठी) उपलब्ध करून देण्यांत येईल. याचा तपशील प्राधिकरणास यथा-वकाश सादर करण्यांत येईल. यामध्यें मुंबई महानगरपालिका - बेस्ट यांना दिलेल्या दुय्यम कर्जाचे मुद्दल व व्याज यांचे हप्ते प्रत्येक संबंधित परिस्थितीत खुद्द प्राधिकरणा-कडून जागतिक बँकेला भरणा करावयाच्या नियत तारखांपूर्वी निदान १५ दिवस आधी

...२

त्यांच्याकडून प्राधिकरणास मिळाले पाहिजेत, यासंबंधी तरतूद असली पाहिजे. त्या-योगे भारत सरकार - रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या बरोबरच्या संबंधित औपचारिक बाबींकडे लक्ष पुरवता येईल.

(ड) केंद्र सरकारकडून जागतिक बँकेस देण्यात यावयाच्या विदेशी चलन हमी-मधील विदेशी चलनविषयक जोखीम (रिस्क) ही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून घेतली जाईल आणि कार्यसूचीत नमूद केल्याप्रमाणे मुंबई महानगर-पालिका / बेस्ट यांच्या बरोबर (पैशाच्या स्वरूपात) तिची विभागणी केली जाईल.

(इ) कार्यसूचीस जोडलेल्या मूल्यन टिप्पण्यांमध्ये जागतिक बँक मंडळाने सुचवलेल्या करारांचा मसुदा मान्य करता येईल, ही मान्यता कर्जासंबंधीच्या वाटाघाटींमध्ये त्यात कोणतेही फेरबदल झाल्यास त्या बदलांच्या अधीन असेल;

(फ) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ याच्या कलम ६७(ब) च्या दुरुस्त्यांमध्ये ~~आंतरराष्ट्रीय विकास संघाकडून~~ जागतिक बँकेने सुचवल्याप्रमाणे कलम ४६० के (क) किंवा आंतरराष्ट्रीय विकास संघाकडून पाणी पुरवठा प्रकल्प कर्जासाठी करण्यात आलेली तत्सम तरतूद यांच्याकरिता सुचवल्यानुसार ''मंजुरी देणे'' या शब्दांऐवजी ''विचारात घेणे व निकालात काढणे'' हे शब्द यथोचित जागी घालावे.

(ग) प्राधिकरणाच्या अेका समितीकडून एक प्रतिनिधिमंडळ निवडण्यात येईल. समितीत अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष व कार्यकारी समितीचा अध्यक्ष यांचा समावेश असेल. या समितीने निवडलेले प्रतिनिधिमंडळ परदेशात जागतिक बँकेबरोबर प्रस्तावित पत कर्जाबाबत वाटाघाटी करील आणि प्राधिकरणाचे जास्तीत जास्त हित लक्षात घेऊन तत्संबंधीच्या अटी अंतिमत: ठरवील.

(ह) वर नेमलेल्या समितीने, या प्रतिनिधिमंडळास अखेरच्या टप्प्यांवर सूचना द्याव्यात. तसेच या मंडळाच्या परदेश भेटीच्या संबंधातील खर्चास मंजुरीही द्यावी या बाबतचे प्राधिकार तिला दिलेले आहेत.

बाब क्रमांक (५): बेस्टला कर्ज.

ठराव (६६): प्राधिकरणाने ठराव केला की :-

(१) बेस्ट उपक्रमाला मुंबई महानगर पालिकेमार्फत १ कोटी ५० लाख रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात यावे. हे कर्ज चालू वित्तीय वर्षामध्ये (१९७५-७६) किंवा एप्रिल १९७६ च्या आरंभी संवितरित करावयाचे असून जागतिक बँकेकडून मिळावयाच्या कर्जा-साठी बेस्टकडे जितक्या बसगाड्यांचा ताफा असणे आवश्यक आहे तितक्या बसगाड्या खरेदी करणे बेस्टला शक्य व्हावे यासाठी हे अर्थसहाय्य असेल.

...३

(२) या कर्जाची परतफेड तीन समान हप्त्यामध्यें करण्यांत येणार असून ते हप्ते ३० सप्टेंबर १९७७, ३० सप्टेंबर १९७८ व ३० सप्टेंबर १९७९ रोजी भरावयाचे आहेत. त्यावरील व्याज दरवर्षास १० टक्के याप्रमाणें असेल व ते दर तीन महिन्यांनी देय होईल. कर्जासंबंधीच्या इतर अटी व शर्ती कार्यकारी समितीकडून ठरवण्यात येतील.

(३) महानगर आयुक्तास याद्वारें, मुंबई महानगर प्रदेश विकास निधीतून रकमांचे वाटप करण्यासाठी प्राधिकृत करण्यांत आले आहे.

बाब क्रमांक (६): अधिकार प्रदान करणे.

ठराव (६७): (एक)अ) प्राधिकरणाचे कामकाज कार्यक्षमपणे व नियमित चालावे यादृष्टीने कार्यक्रम पत्रिकेच्या जोडपत्रांमध्यें नमूद केलेले अधिकार प्रदान विनियमांच्या स्वरूपात असावे असा ठराव प्राधिकरणाने केला.

ब) प्राधिकरणाने पुढे असे निदेश दिले की, उक्त प्रदान खालील गोष्टी रीतसर विचारात घेऊन करण्यांत येईल :-

१) प्रदान केलेले अधिकार, संबंधित खर्च भागवण्यासाठी अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदींच्या अधीन राहून वापरता येतील.

२) भांडारवस्तूंवर खर्च करण्याच्या अधिकारांचा वापर करता येईल, मात्र या वस्तू, प्रशासनिक किंवा तांत्रिक रीत्या मंजुरी मिळालेल्या योजनांकरिता आवश्यक असल्या पाहिजेत किंवा अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या योजनांकरिता उद्देशिलेल्या असल्या पाहिजेत किंवा स्थायी समितीने वेळोवेळी प्राधिकृत केलेल्या साठ्याच्या प्रयोजनासाठी असल्या पाहिजेत.

३) सक्षम प्राधिकाऱ्यापेक्षा वरिष्ठ असलेला कोणताही प्राधिकारी कनिष्ठ प्राधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करण्यास सक्षम असेल.

४) विवक्षित अधिकार प्रदान केलेल्या एखाद्या पदाचे पदनाम बदलण्यात आले तर पूर्वीच्या प्राधिकाऱ्याला जे अधिकार प्रदान करण्यांत आले होते तेच अधिकार पुन्हा पदनिर्देशित केलेल्या पदास वापरण्याचे चालू ठेवता येईल असे घोषित करण्यास अध्यक्ष सक्षम असेल.

५) निकडीच्या प्रकरणांमध्यें, प्राधिकरणाची मंजुरी मिळेल अशा अपेक्षेने अध्यक्ष त्याला प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारांपेक्षा अधिक अधिकार वापरण्यास सक्षम असेल.

(दोन) प्राधिकरणाने असेही निदेश दिले आहेत की, कार्यात्मक मंडळाच्या निव्वळ कार्यकारी कामांसंबंधीचे अशाच प्रकारचे प्रस्ताव प्राधिकरण आयुक्ताने त्यांच्या अध्यक्षांशी व सदस्य सचिवांशी विचार विनिमय करून तयार करावेत व

...४

ठराव ५२ अन्वये यापूर्वीच नेमलेल्या समितीपुढे ते विचारार्थ ठेवावेत व नंतर प्राधिकरणाकडे आदेशार्थ प्रस्तुत करावेत.

बाब क्रमांक (७): मुंबईतील जमिनीच्या वापरासंबंधीची प्रकरणे.

ठराव (६८): (१) ठराव ६० अनुसार नेमलेल्या समितीच्या शिफारशी प्राधिकरणाने विचारात घेतल्या व खालील दुरुस्त्यांसह त्या स्वीकाराव्या असा ठराव केला:-

(एक) उप - परिच्छेद २(क) मध्ये, '' सध्या अस्तित्वात असलेल्या चित्रपट गृहांच्या व नाट्यगृहांच्या पुनर्बांधणीस परवानगी देताना, त्याच बरोबर संबंधित जागांमध्यें या सार्वजनिक करमणुकीसाठी पुरेशी तरतूद करण्यात येत आहे याचीही खात्री करुन घ्यावी'' हे वाक्य अखेरीस घालावे.

(दोन) उप - परिच्छेद २(ड) बाबत असे ठरवण्यात आले की, उप - परिच्छेद (अ),(ब) आणि (क) हे फक्त मुंबई बेटापुरतेच मर्यादित असतील, त्यानुसार हा उप परिच्छेद ''(अ),(ब) आणि (क) च्या तरतुदी मुंबई बेटाच्या हद्दींना लागू करण्यांत याव्यात'' याप्रमाणें दुरुस्त करण्यात येईल.

(तीन) उप - परिच्छेद २ (फ) च्या पहिल्या वाक्याची सुरुवात ''मुख्यत: विदेशी पाहुण्यांची खाद्य-पेय व्यवस्था करणा-या व जे वाढवण्याकरिता विकास नियंत्रण नियमांत काही सवलती देण्यात आल्या आहेत अशा अस्सल पर्यटक हॉटेल पेक्षा"या वाक्यांशाने करण्यात यावी.

(चार) २(ग) व (के) या दोन्ही उप - परिच्छेदांत ''स्थायी समिती'' याआधी ''(प्राधिकरणाची)'' हे शब्द घालावेत.

(पाच) उप - परिच्छेदे २(न) मध्ये ''चालू राहतील'' या शब्दांऐवजी ''खात्री देण्यांत आली आहे'' हे शब्द घालावेत आणि ''पूर्वीचे -------प्रकारचे'' हे अखेरीस येणारे शब्द वगळावेत.

(सहा) परिच्छेद २(र)(तीन) च्या शेवटी ''सामान्य सेवांच्या कर्मचा-यांकरिता आवश्यक असलेल्या निवासस्थानांव्यतिरिक्त असतील'' हे वाक्य घालावे,

(सात) उप - परिच्छेद २ (आर्) (चार) मध्यें ''नोकरांची निवासस्थाने'' या शब्दानंतर ''सामान्य सेवांच्या कर्मचा-यांना आवश्यक असलेल्या - - - - - सह घ्यावे''. हे शब्द घालावेत. तसेच, ''उक्त सामान्य गटाने - - - संबध्द क्षेत्र'' हे शब्द वगळावे, त्याच्या गुणवत्तेसंबंधी, प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत चर्चा करण्यांत येईल.

(आठ) २(स) हा नविन उप - परिच्छेद खालील प्रमाणें घालण्यात यावा-

...५

''वाढत्या लोकवस्तीकरिता सार्वजनिक करमणुकीच्या व मनोरंजनाच्या अधिक स्थळांची सामान्यत: गरज आहे. म्हणून, ही स्थळे जवळपासच्या भागांतील योग्य ठिकाणच्या नागरी सोयींच्या बरोबरीची समजता येतील.''

(नऊ) परिच्छेद ३ मध्ये पहिल्या वाक्यात, ''संरक्षण'' या शब्दानंतर आणि ''अथवा पोर्ट ट्रस्ट'' या शब्दांपूर्वी ''रेल्वे'' हा शब्द घालावा आणि वापरलेले या शब्दानंतर आणि ''त्यांच्याकडून'' या शब्दापूर्वी ''वापरावयाचे'' हा शब्द घालावा.

दुसरी गोष्ट म्हणजे, ''ही गोष्ट रेल्वेच्या बाबतीतसुध्दा तितकीच खरी आहे'' अशा प्रकारचे वाक्य, कार्यसूचीच्या टिप्पणीच्या दुस-या व तिस-या वाक्यांच्यामध्ये समाविष्ट करण्यात यावे.

(दहा) पुढील प्रमाणे नवीन परिच्छेद ४ समाविष्ट करण्यांत यावा:-

''४. शासनाने, प्राधिकरणाने किंवा (प्राधिकरणाच्या) स्थायी समितीच्या पूर्वसंमतीने कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने हाती घेतलेल्या, योग्य अशा नागरी नवीकरणाच्या व पुनर्रचनेच्या योजनांची आखणी व अंमलबजावणी करण्याचे काम वरील निर्णयांतील कोणत्याही गोष्टीमुळे थांबते किंवा, त्यात अडथळा उत्पन्न होतो असे मानण्यात येता कामा नये.''

२) वरील गोष्टींची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या कार्यवाहीच्या बाबतीत प्राधिकरणाने पुढील प्रमाणे निर्णय घेतले आहेत:-

(एक) कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत, विकास नियंत्रणाविषयीच्या सध्याच्या नियमांत योग्य ते बदल करता येतील व अशी कारवाई तात्काळ करण्यांत यावी;

(दोन) राहण्याच्या जागेचा परत उपयोग करणे हे शक्य तितक्या प्रकरणांत योग्य ठरविण्यासाठी मुंबई भूमी संपादन अधिनियम, १९४८ अन्वये कारवाई करण्यासाठी शासनाला विनंती करण्यात यावी.

(तीन) पुढील गोष्टी करण्यासाठी कार्यकारी समितीने उरलेल्या बाबींची तपासणी करावी:-

(अ) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ याअन्वये धोरण विषयक अधिसूचनेचा मसुदा तयार करणे आणि -

(ब) ज्यांच्या बाबतीत, मुंबई महानगर पालिका अधिनियमाच्या कलम १५४ अन्वये निदेश काढण्यासाठी किंवा नवीन कायदा तयार करण्यासाठी राज्यसरकारला विनंती करावी लागेल अशा उरलेल्या बाबी ठरविणे. ह्या कारवाईबाबत मार्गदर्शन करण्यासाठी सुध्दा ज्यांनी या बाबतीतील संपूर्ण अभ्यासाचे मार्गदर्शन केले आहे त्या मुख्य सचिवांना प्राधिकरणाने विनंती केली. (अ) अन्वये अशारीतीने

तयार करण्यात आलेला धोरणविषयक अधिसूचनेचा मसुदा स्थायी समितीकडे सादर करण्यात यावा. तो मसुदा अंतिम स्वरुपात संमत करण्यास आणि त्या विषयीची अधिसूचना काढण्यास याद्वारे प्राधिकरणाने स्थायी समितीला प्राधिकृत केले आहे.

३) वरील प्रमाणेँ संमत केलेली तत्वे व धोरणे यांचा अर्थ लावतांना कोणती-ही अडचण उद्भवल्यास ती, ठराव ६० अन्वये स्थापन केलेल्या समितीसमोर ठेवण्यात यावी व तिने दिलेला सल्ला अनुसरण्यात यावा असेहि प्राधिकरणाने ठरविले आहे. लोकांचा फार मोठा हितसंबंध ज्यात अंतर्भूत असेल केवळ अशाच गोष्टी वेळोवेळी पुढील आदेशांसाठी प्राधिकरणासमोर ठेवण्यात आल्या पाहिजेत.

४) बृहन्मुंबईच्या उपनगरांमध्येँ । विस्तारित उपनगरांमध्येँ व्यापारी उप-योगाचे प्लॉट । क्षेत्रे अधिक प्रमाणात निर्माण करण्याची गरज आहे या गोष्टीची ही प्राधिकरणाने दखल घेतली आहे, सध्या मात्र अशी क्षेत्रे केवळ मुंबई बेटामध्येच अस्ति आहेत. ह्या बाबींची कार्यकारी समितीने तात्काळ तपासणी करावी आणि कायद्याअन्वये आवश्यक ती कारवाई करण्यासाठी शासनाला । मुंबई महानगरपालिकेला विनंती करण्यात येण्यापूर्वी योग्य ते प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवण्यात यावेत.

बाब क्रमांक (८): मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाच्या प्रयोजनासाठी ''सोयींबाबत'' अधिसूचना.

ठराव (६९): नागरी क्षेत्रांचा व्यापक विकास होण्यासाठी बाजार, गुदामे, वखारी, कत्तलखाने आणि करमणुकीची व मनोरंजनाची ठिकाणे ह्यांना ''सोयी'' असे समजण्यात येणे आवश्यक आहे असे प्राधिकरणाने ठरविले. म्हणून प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या प्रयोजनांकरिता वर निर्दिष्ट केलेली विकासविषयक कामे ''सोय'' म्हणून समाविष्ट केलेली योग्य अशी राजपत्रातील अधिसूचना काढण्यासाठी राज्यसरकारला विनंती करण्याबाबत महानगर प्रदेश आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

बाब (९): अध्यक्षांच्या परवानगीने घेण्यात यावयाच्या इतर बाबी. खोपोली येथील जमिनी संपादन करण्याबाबतची अधिसूचना ठराव ५७ मध्येंच अंतर्भूत झालेली आहे.

ठराव (७०): मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अन्वये किंवा नागरी जमीन कमाल मर्यादा अधिनियम, १९७६ यापैकी ज्या अन्वयेचे संपादन योग्य व अधिक काटकसरीचे असेल त्याअन्वये संबंधित क्षेत्रांचे संपादन (ठराव ५७ पहा) करण्याबाबत प्राधिकरणाने ठराव मंजूर केला. प्राधिकरणाने महानगर प्रदेश आयुक्तांना आवश्यक ती कारवाई करण्यास आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अन्वये आवश्यक ती अधिसूचना काढण्यासाठी सरकारला विनंती करण्यास प्राधिकृत केले आहे.

.....................

दिनांक २६ मार्च १९७६ रोजी झालेल्या ५ व्या बैठकीस उपस्थित असलेल्या सभासदांची सूची:-

डॉ. रफिक झकेरिआ - नगर विकास मंत्री.
श्री जगेश देसाई. - नगर विकास राज्यमंत्री.
श्री नानालाल डी. मेहता - मुंबईचे महापौर.
श्री पी. के. कुटे. - गृहनिर्माण व सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री.
श्री अेस्. अे. सोळंके. - गृहनिर्माण मंत्री.

| | |
|---|---|
| श्री एन्. एम्. वंगारे. | श्री डी. बी. पाटील. |
| श्री व्ही. एस्. महाडीक. | श्री एन्. एस्. वागळे. |
| श्री हंसराज भुग्रा. | श्री डी. डी. साठे. |
| श्री पुष्पकान्त ए. म्हात्रे. | श्री बी. जी. देशमुख. |
| श्री सोहनसिंग कोहली. | श्री जे. सी. अग्रवाल. |
| डॉ. एस्. जी. परनळेकर. | श्री व्ही. रामनाथन. |
| श्री डी. एन्. पाटील. | श्री एम्. एस्. मुथन्ना. |
| श्री व्ही. के. टेंबे. | श्री एम्. ए. खांडवानी. |
| श्रीमती कमला रामन. | श्री मनोहर गो. जोशी. |
| श्री एस्. एस्. दीघे. | श्री हाशू अडवानी. |
| श्री जी. एम्. बनातवाला. | श्री एम्. आर्. यार्दि. |
| श्री नकुल पी. पाटील. | श्री एस्. जी. घोलप. |

आमंत्रण दिलेल्यांची यादी.

महाराष्ट्र राज्याचे सचिव, (नगर विकास)
व्यवस्थापकीय संचालक, सिडको.

. . . . . . . . . . . . . . .

**:जोडपत्र 'ब':**

महसूल, नगरविकास, पर्यटन व राजशिष्टाचार मंत्री व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष, डॉ. रफिक झकरिया, ह्यांनी दिनांक २६ मार्च १९७८ रोजी पांचव्या बैठकींत केलेले भाषण:-

माननीय सदस्य,

या प्राधिकरणाचे जे प्रथमत: व सदस्य झालेले आहेत अशा, मंत्रीमंडळातील माझ्या सहका-यांचे येथे स्वागत करण्यास आज मला आनंद होत आहे. आपल्या चर्चेत ते सहभागी झाल्यामुळें, आपल्या योजना व धोरणे ह्यांची प्रगति होण्यास व त्यांची अंमलबजावणी करण्यास अमूल्य सहाय्य होईल.

आपल्या मागील बैठकीचे कार्यवृत्त मराठीतून सुध्दा प्रसृत करण्यांत आले आहे, ह्याचा उल्लेख करण्यास सुध्दा मला आनंद होत आहे.

गेल्या वेळी आपली बैठक झाली तेव्हांपासून मुंबई नगर वाहतूक प्रकल्पाची बरीच प्रगति झाली आहे. आजच्या कार्यसूचीवरील महत्वाची बाब म्हणजे हा प्रकल्प व जागतिक बँकेकडून त्यासाठीं मिळावयाचे कर्ज ही होय. अलीकडेच आलेल्या मूल्यम मंडळाने ह्या प्रकल्पाच्या आकाराचे परिमाण ठरविले आहे आणि आपली स्थिती सुधारण्या-बाबतच्या वाटाघाटींना अधीन राहून, ह्या प्रकल्पासाठी जागतिक बँकेकडून तेवढे कर्ज मिळू शकेल हे आपणास दिसून येईलच. प्रकल्पाच्या निरनिराळ्या घटकांशी संबंधित असलेल्या प्राधिकरणांकडून काही कामे पूर्ण व्हावयाची आहेत, त्याकडे लक्ष पुरवण्यात येत आहे. निरनिराळ्या कार्यांचे समन्वयन करणे आणि प्रकल्पाच्या नियमित प्रगतीवर लक्ष ठेवणे ह्या गोष्टींची प्रमुख जबाबदारी मात्र खुद्द मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणावरच पडणार आहे. ह्या कामाकडे लक्ष देण्यासाठी काही कर्मचारी वर्गाची निर्मिती करावी लागेल.

महानगरप्रदेश क्षेत्रांना योजनांतर्गत सहाय्य देण्याच्या एकत्रित योजनेअन्वये भारत सरकारने, त्यानेच दिलेल्या सहाय्याच्या शर्ती शिथिल केल्याबद्दल आपण भारत सरकार आभार मानले पाहिजेत. जरी ही गोष्ट मागील वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार झालेली असली तरी हे भूतकाळापेक्षा सहाय्य केल्याबद्दल आपली कृतज्ञेची भावना मुळीच कमी असणार नाही.

मागील बैठकीमध्यें आपण प्राधिकरणाच्या एका समितीकडे बृहन्मुंबईतील जमिनीं-च्या उपयोगाच्या बाबीसंबंधीचे प्रस्ताव पाठविले होते, त्या समितीने आपले काम पूर्ण केले असून आजच्या बैठकीत आपल्याला त्या समितीच्या शिफारशींवरच चर्चा करावयाची आहे. या शिफारशींवरील आपली चर्चा आणि त्यावर आपण जी कारवाई करणार आहोत ती कारवाई यांचा, मुंबई महानगरपालिकेकडून बृहन्मुंबई विकास योजनेची आणखी पुनर्रचना करण्यात येईपर्यन्त, व्हावयाच्या विकास विषयक कार्यावर बराच परिणाम होणार आहे.

..............
..

(75)

Minutes of the Fifth meeting of the BMRDA

held on 26th March 1976.

1) The list of members present is attached. Annexure 'A'

2) The meeting began with an address by the Chairman.

A copy of the address was circulated to the members. Copy attached as Annexure 'B'.

3) ITEM No. 1 : Confirmation of the minutes of the last (Fifth) meeting held on 26th March 1976.

RESOLUTION 62 :

The minutes of the fourth meeting held on 14th February 1976 were confirmed.

ITEM No. 2 : Action taken on the minutes of the last meeting.

Resolution 63 :

The action taken was noted.

ITEM No. 3 : Revision in terms of Government of India loan assistance.

Resolution 64 :

The item was considered and noted.

ITEM No. 4 : Bombay Urban Transport Project.

Resolution 65 :

The Authority discussed the contents of the Agenda Note No.4, relating the the Bombay Urban Transport Project and resolved that :-

(a) a loan may be sought from the World Bank for the Bombay Urban Transport Project as appraised by the World Bank Appraisal Mission and set down in the notes attached to the Agenda Note;

(b) the Metropolitan Commissioner should take action on the various points referred to in the appraisal notes and in accordance with the recommendations made in the Agenda Note in respect of each, seeking the orders of the Chairman wherever required;

(c) the terms of the World Bank loan and the quantum thereof shall be those which are negotiated by the Government of India, in the interest of the country as a whole from the foreign exchange point of view; subject to these and the on-lending terms, if any, proposed by the World Bank, the proceeds of the credit so negotiated shall be made available to the BMC (both for itself and for the benefit of the BEST) in accordance with the requirements of the

2....

Bombay Urban Transport Project. The details of these will be placed before the Authority in due course; these should provide that the instalments of principal and interest of the subsidiary loans to the B.M.C./B.E.S.T. should be with the Authority at least 15 days prior to the due dates of their payment to the World Bank from the Authority itself, on each occasion concerned, so as to attend to the connected formalities with the Government of India/Reserve Bank of India;

(d) within the foreign exchange guarantee that would be provided by the Central Government to the World Bank, the foreign exchange risk would be borne by the BMRDA and shared (in monetary terms) with the BMC/BEST as set down in the Agenda Note;

(e) the draft covenants suggested by the World Bank Mission in the appraisal notes attached to the agenda note may be accepted subject to any modifications that would arise in the course of the credit negotiations;

(f) in the amendments to sec.67(b) of the B.M.C. Act of 1888 suggested by the World Bank, the words "give sanction" should appropriately be replaced by the words "consider and dispose of ", as suggested for the section 460 K (c), or the corresponding provision for the Water Supply Project loan from the I.D.A.;

(g) a delegation to be selected by a Committee of the Authority consisting of the Chairman, two Vice-Chairmen and the Chairman of the Executive Committee would conduct the negotiations with the World Bank abroad for the proposed credit and finalise the terms thereof in the best interests of the Authority;

(h) the Committee appointed above is authorised to instruct the delegation in the final stages and also sanction the expenditure connected with its visit overseas.

ITEM No. 5 : Loan to B.E.S.T.

Resolution 66 :

The Authority resolved that :-

(i) The B.E.S.T. undertaking be sanctioned through the B.M.C a loan of Rs. 1 crore 50 lakhs, to be disbursed during the current financial year (1975-76) or early April 1976, to assist it in building up its bus fleet to a level required for its receiving the proposed loan assistance from the World Bank;

3...

(ii) The loan shall be repaid in three equal instalments on 30-9-1977, 30-9-1978 and 30-9-1979 and carry interest at 10% per annum, which shall be payable quarterly. The other terms and conditions of the loan shall be decided by the Executive Committee;

(iii) The Metropolitan Commissioner be hereby authorised to effect the disbursement from the Bombay Metropolitan Region Development Fund.

ITEM No. 6 : Delegation of powers.

Resolution 67 :

I a) The Authority resolved that the delegation of powers set down in the Annexures to the Resolution be adopted, in the form of Resolutions, in the interest of the efficient and regular working of the Authority.

b) The Authority further directed that the said delegation shall be exercised with due regard to the following :-

1) The powers delegated shall be exercisable subject to provision made in the Budget to meet the connected expenditure;

2) Powers to incur expenditure on stores shall be exercisable, provided they are required for administratively or technically sanctioned schemes or are intended for the schemes included in the Budget or for stocking purposes authorised from time to time by the Standing Committee;

3) Any authority higher than the Competent Authority shall be competent to exercise the powers of the lower authority;

4) In case the designation of a post to which a specific power is delegated is changed, the Chairman shall be competent to declare that the powers delegated to the previous authority will continue to be exercisable by the redesignated post;

5) In emergent cases, the Chairman shall be competent to exercise, in anticipation of Authority's approval, powers in excess of those delegated.

II The Authority also directed that similar proposals relevant to the purely executive funtions of the Functional

Boards should be formulated by the Metropolitan Commissioner in consultation with their Chairman and Member-Secretaries and placed for consideration before the Committee already appointed under the Resolution 52 and then put up to the Authority for orders.

ITEM No. 7 : Matters relating to land use in Bombay.

Resolution 68 :

1) The Authority took into consideration the recommendations of the Committee appointed under Resolution 60 and resolved to adopt them with amendments as under :-

(i) In sub-para 2(c), the sentence: "It should be equally ensured while permitting reconstruction of any existing cinemas and drama theatres, that adequate provision continues to be made for these modes of public entertainment in the respective premises" be added at the end.

(ii) It was decided with regard to sub-para 2(d) that sub-paras (a), (b) and (c) may be limited to the Island of Bombay; this sub-para will be amended accordingly to read: "The provisions of (a), (b) and (c) should apply to the limits of the Island of Bombay";

(iii) The first sentence of sub-para 2(f) should begin with the clause: "As distinct from the genuine tourist hotels catering to foreign visitors primarily and for promoting which certain concessions have been made in the Development Control Rules";

(iv) The words "(of the Authority)" be added after "the Standing Committee" in both the sub-paras 2(g) and 2(k);

(v) In the sub-para 2(n), the words "continue to have" be replaced by "are assured of" and the words "of the type.... earlier" at the end be deleted;

(vi) The sentence: "These would be additional to the quarters required for the common services staff" be added at the end of para 2(r) (iii);

(vii) In the sub-para 2(r) (iv), the words "(taken along with those needed for the common services staff)" be added after the words "servants Quarters".

Secondly, the words reading "the connected area.... by the said common block" be presently deleted; this will be discussed on merits of its own at the next meeting of the Authority.

(viii) A new sub-para 2(s) be added to read :-
"There is a general need for more places of public entertainment and recreation to cater to the increasing population. Hence these could be considered on par with ~~Cine~~ civic amenities in theappropriate neighbourhoods";

(ix) In para 3, the words, "the Railways" be added after "Defence" and before "or the Port Trust", and the words "to be used", after "used" and before "by them", in the first sentence; Secondly, a new sentence reading "This is equally true of the Railways", should be inserted between the second and third sentences of the agenda note;

(x) A new para 4 should be added as under :-
"4. Nothing in the above conclusions should be taken to halt or impede the planning and execution of the appropriate urban renewal and reconstruction schemes undertaken by Government, the Authority or any local authority with the prior approval of the Standing Committee (of the Authority)".

2) As regards the action required to implement and enforce the above matters, the Authority resolved as under :-

(i) In whatever matter the current Development Control Rules can be amended appropriately, such action should be taken immediately;

(ii) Government should be requested to take action under the Bombay Land Acquisition Act, 1948, to restore, in as many cases as appropriate, the use of premises back to the residential nature;

(iii) The remaining matters should be examined by the Executive Committee with a view to (a) drafting a policy notification under the BMRDA Act, 1974 and (b) identifying the remaining matters in regard to which the State Government may have to be requested to either issue directions under section 154 of

6....

the BMC Act or introduce new legislation. The Authority requested the Chief Secretary, who had piloted the entire studies, to guide these actions as well. The policy notification so drafted under (a) should be submitted to the Standing Committee, which was authorised hereby by the Authority to approve it in the final form and have it issued.

3) The Authority also decided that any difficulty that is faced in interpreting the principles and policies approved as above should be placed before the same committee as that constituted under Resolution 60 and its advice should be followed; only where the larger public interests so demand should the matter be brought before the Authority from time to time for further orders.

4) The Authority also noted that there was a need to create more commercial user plots/areas in the suburbs/extended suburbs, of Greater Bombay while such activity is curbed within the Island limits. This should be examined urgently by the Executive Committee and appropriate proposals put up to the Standing Committee for its consideration before Government/BMC are moved to take necessary acti n under law.

ITEM No. 8 : Notification for "amenities" for the purposes of the B.M.R.D.A. Act.

Resolution 69 :

The Authority resolved that markets, godowns, warehouses, slaughter houses and places of recreation and entertainment are required to be treated as "amenity" to ensure comprehensive development of urban area. The Authority, the-refore, authorised the Metropolitan Commissioner to request the State Government to issue a suitable Gazette Notification so as to include the abovementioned developmental activities as "amenity" for the purposes of the B.M.R.D.A. Act, 1974.

ITEM No. 9 : Other items with the permission of the Chairman Notification of acquisition of the lands in Khopoli covered by Resolution 57.

Resolution 70 :

The Authority resolved that the acquisition of the concerned areas (vide Resolution 57) may be proceeded with either under the B.M.R.D.A. Act, 1974 or the Urban Ceiling Act, 1976, whichever is appropriate and more economical.

(83)

Annexure 'A'

List of Members present at the 5th meeting held on 26th March 1976.

Dr. Rafiq Zakaria,
Minister for U.D.

Shri Jagesh Desai,
M.S.U.D.

Shri Nanalal D. Mehta,
Mayor of Bombay

Shri S.A. Solanke,
Minister for Housing

Shri P.K. Kunte,
Minister of State for Housing & Public Works.

Shri H.M. Wangare,

Shri V.S. Mahadik

Shri Hansraj Bhugra

Shri Pushpakant A. Mhatre

Shri Sohan Singh Kohli

Dr. M.G. Parulekar

Shri D.N. Patil

Shri V.K. Tembe

Smt. Kamala Raman

Shri S.S. Dighe

Shri G.N. Banatwala

Shri Nakul P. Patil

Shri D.B. Patil

Shri N.M. Wagle

Shri D.D. Sathe

Shri B.G. Deshmukh

Shri J.C. Agarwal

Shri V. Ramanathan

Shri M.S. Muthanna

Shri M.A. Khandwani

Shri Manohar G. Joshi

Shri Hashu Advani

Shri M.R. Yardi
Shri S.G. Gholap

List of Invitees:

Secy. to Government, U.D.

Managing Director, CIDCO.

Annexure B (85)

Text of the Speech of Dr. Rafiq Zakaria, Minister for Revenue, Urban Development, Tourism, Protocol and Chairman, BMRDA, at the -- Fifth Meeting on the 26th March, 1976.

......

Gentlemen,

I am glad to welcome in our midst today my colleagues in the Cabinet, who have become members of the Authority for the first time. Their participation in our deliberations should be valuable to the progress and implementation of our plans, policies and -- schemes.

It is also heartening for me to mention that the minutes of our last meeting have been circulated in Marathi as well.

Since we last met, the Bombay Urban Transport Project has made substantial progress. An important item on the Agenda today concerns this project and the prospective loan for it from the -- World Bank. As you will notice, the size of the project has been quantified by the recent Appraisal Mission and, subject to the negotiations bettering our position, we could reckon upon this amount of credit from the World Bank for this project. Certain actions have to be completed by the authorities concerned with the different components of the project and these are being -- attended to. On the BMRDA itself the major responsibility will fall of co-ordinating the various activities and monitoring the progress of the project regularly. We would have to create some staff for attending to this work.

We should also thank the Government of India for liberalising the terms of the assistance given by it under the Integrated Scheme of Plan Assistance to Metropolitan Areas. Although this may be in keeping with the recommendations of the last Finance Commission, our sense of appreciation would be no less for this retrospective relief.

At the last meeting we referred to a Committee of Authority a set of proposals relating to land use matters in Greater Bombay. It has completed its work and we are to discuss its recommendations at today's meeting. Our discussions on these and the action that we wish to take on them will have an important bearing on the -- development activities until the next revision of the Greater Bombay Development Plan by the Bombay Municipal Corporation.

.........

The Authority authorised the Metropolitan Commissioner to take necessary action and request Government for issue of the requisite notification, if it is to be under the BMRDA Act, 1974.